# गोखले

गोखले टिळक रोडवरच्या महाराष्ट्र बँकेत होते.

बाजीराव रोडला घर आणि दूर टिळक रोडला नोकरी... असं खूप मोठ्ठं सीमोल्लंघन गोखले दररोज करीत असत. आमचे वडिल हे गोखल्यांचे श्रद्धास्थान. आयुष्यातली कोणतीही छोटीमोठी गोष्ट गोखले वडिलांशी शेयर केल्याशिवाय रहात नसत. आमच्या वडिलांची दाद त्यांना महत्त्वाची वाटे. आमच्या वडिलांकडे त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आहे अशीही गोखल्यांची एक ठाम श्रद्धा होती.

त्यांच्या चाललेल्या गप्पा ऐकण्याचा अनेकदा योग येत असे.
कधी कधी गोखले भयानक अस्वस्थ होवून विचारीत "काय चाललंय या देशात ? अरे हिंदूंना कुणी वाली आहे की नाही ?"
आमचे वडिल अशावेळी फक्त श्रोत्याची भूमिका घेत. कारण प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सामान्य माणसाकडे असतेच असे नाही.

एकदा असेच गोखले घरी आले. कुठेतरी हिंदूंवर हल्ला झाल्याची बातमी होती.
त्याची चर्चा करत होते.

एकदम पेटून उठले आणि म्हणू लागले, "या साल्यांना कापून काढलं पाहीजे, त्याशिवाय हे हरामखोर वठणीवर येणार नाहीत" अर्थात ते बोलले म्हणजे त्यामागे निश्चयाचे सामर्थ्य असणार अशी आमची खात्री होती. बॅंकेच्या कामातून रजा घेऊन ते पुण्याबाहेर जातात तेव्हा अशी कापाकापी करायलाच जात असावेत. अशी आमची समजूत होती.

जम्मू-काश्मीरात हिंदूच्या हत्या, हिंदू मुलींची छेडछाड आणि नंतर हिंदूंना आपली पिढ्यानपिढ्यांची भूमी सोडून जावे लागले या बातम्यांनी सगळे पेपर रंगलेले असत.
त्या वेळी गोखल्यांचा वडिलांना तळमळून प्रश्न असे "काय चाललंय जम्मू-काश्मीरात ? हिंदू असाच सर्वत्र मार खाणार का ?"
अशा वेळी त्यांच्या चेहेऱ्यावरचा आवेश पाहण्यासारखा असे. आता पुढच्याच क्षणाला हे तलवार घेवून जम्मू-काश्मीरातल्या दहशतवाद्यांना संपवायला बाहेर पडणार असं वाटे.
एकदा ते म्हणाले, "जी गोष्ट महाराजांच्या काळात शक्य होती, ती आज का शक्य होऊ नये ?"

"कोणती गोष्ट ?"
गोखले "घरवापसी आज का शक्य नाही"
आता यावर काय बोलणार.

अहिंसेच्या तत्त्वज्ञानामुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले आहे. असे गोखले नेहमी बोलून दाखवत. अहिंसेची ते नेहमी टरही उडवत असत.

या सगळ्यामुळे लहानपणी बराच काळ माझा पक्का समज होता की गोखले बँकेत देखील बंदूक घेऊन काम करतात किंबहूना हातात बंदूक घेऊन बॅंकेच्या दारात(सीमेवर) लढण्याचीच त्यांची ड्यूटी असावी.

हा समज बराच काळ टिकला. पुढे त्याच बँकेत अगदी मायनॉर असताना वडिलांनी खाते उघडून दिल्यावर प्रथम तिथे गेलो. तेव्हा काऊंटरपलिकडे बसलेले आणि हातात लेखणी असलेले गोखले दिसले. तेव्हा तो समज दूर झाला.

अर्थात नेहमी देव, देश, स्वधर्म, अखंड हिंदूराष्ट्र या गोष्टीच ते बोलत असत. क्षुल्लक गोष्टी त्यांच्या बोलण्यात कधीही डोकवत नसत.

बरेच दिवस गोखल्यांना आमच्याकडे चक्कर टाकणे जमले नाही. पण एक दिवस ते आले. बोलण्यातही नेहमीचा जोश नव्हता. आमच्या मनात उगाचंच शंका

"मूंग्यांनी मेरु पर्वत तर गिळला नाही ना,
हिंदूंनी पुन्हा कुठेतरी सपाटून मार तर खाल्ला नाही ना, हिंदूस्थानची पुन्हा एखादी फाळणी तर झाली नाही ना,
मग गोखले तुमचा चेहेरा असा निस्तेज का"

मग ते सांगू लागले, "अहो फार मोठं राजकारण झालं. आमच्या बँकेत एवढे लोक आहेत पण सगळ्यांना सोडून साहेबांनी माझीच बदली केली. पार लांब टाकून दिलं"

नेमकं याच काळात आमच्या छोट्या काकांना त्यांच्या बँकेने प्रमोशन दिले आणि लांब बदली केली कानपुरला. ते तिकडे जॉइनही झाले. असाच प्रकार असणार. गोखले अटकेपार झेंडे फडकवणार वगैरे वाटू लागले.

म्हणून त्यांना विचारले कुठे झाली बदली. ते म्हणाले लांब तिकडे पुलाच्या पलिकडे शिवाजीनगरच्या लोकमंगल ब्रांचला.
यावर वडिलांचा प्रश्न "बरं मग"

गोखले "अहो, बरं मग काय ? पूर्वी मी बाजीराव रोडच्या घरून चालत निघालो तरी टिळक रोडच्या ब्रांचला २० मिनिटात पोचत असे. मधल्या सुटीत जेवायला घरी जात असे. बायकोच्या हातच्या गरमागरम पोळ्या खात असे. पण आता ते शक्य नाही हो"

ashu j